# नगर परिषद, कळमेश्वर-ब्राम्हणी

**Website : www.mckalmeshwar. E-mail ID : mckalmeshwar@gmail.com**

**E-mail ID : coud.kalmeshwar@maharashtra.gov.in**

**जावक क्रमांक :** अग्नी वि./अग्नी ना-हरकत प्रमाणपत्र/ 2367 /२०२३ **दिनांक :** 29/०३/२०२३

प्रति,

Jindal Vidya Mandir

JSW Housing Colony

MIDC, Kalmeshwar

**विषय :-** अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबत

**संदर्भ:-** शाळा व्यवस्थापक व मुख्याध्यापिका यांचे जिंदल विद्या मंदिर, कळमेश्वर यांचे कार्यालयीन आवक पत्र क्र. ६४१दि. १४/०२/२०२३

आपणास याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार –श्री. एस.बी. कलशेट्टी, शाळा व्यवस्थापक व श्रीमती. पल्लवी चक्कीलाला मुख्याध्यापिका जिंदल विद्या मंदिर, JSW Housing Colony कळमेश्वर, ता. कळमेश्वर, जि. नागपूर यांचे जिंदल विद्या मंदिर ला अग्निशमन ना- हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास अर्ज प्राप्त झालेला होता. त्या अनुषंगाने **जिंदल विद्या मंदिर, JSW Housing Colony कळमेश्वर, जि. नागपूर** ला खालील अटी व शर्ती चे अधीन राहूनच **अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र** देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

१) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता २०१६ च्या सुधारणेसह अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आपली राहील.

२) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम १० नुसार अग्निशमनबाबत सर्व उपाययोजना करण्याची जबाबदारी आपणावर राहील.

अ) जर अग्निशमन अधिकारी सदर इमारतीत अग्निशमन उपाययोजना बाबत समाधानी नसेल तर इमारतीत अग्निशमन बाबत आवश्यकत्या उपाययोजना मान्यताप्राप्त संस्था मार्फत करून घेण्याची जबाबदारी आपणावर बंधनकारक राहील.

आ) आपल्या इमारतीमध्ये आवश्यकत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत असे प्रमाणपत्र संबंधित मान्यताप्राप्त संस्थेमार्फत प्रमाणपत्र नमुना 'अ' मध्ये व लावलेल्या साहित्याची यादी सह सादर करणे आपणास बंधनकारक राहील.

३) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता २०१६ कायद्या अंतर्गत अर्जदाराने अटीची पूर्तता न केल्यास सदर इमारतीचा विकासक/ मालक/ भाडेकरू/ व भोगवटदार जो कोणी असेल भविष्यात होणाऱ्या हानीस जबाबदार राहील.

४) श्री. जे.एस.डब्लयु स्टील कोटेज प्रोडूक्ट्स लि. कळमेश्वर स्कूल बिल्डींग यांचे मालमत्ता धारक/ अर्जदार यांनी सदर जागेत किंवा आजूबाजूच्या जागेत/परिसरात आपत्कालीन परिस्थिती उद्धवल्यास सदर घटनेकरिता आपण सर्वस्वी जबाबदार राहाल. त्यात न.प. कळमेश्वर-ब्राम्हणी ची कुठलीही जबाबदारी राहणार नाही.

५) संबंधित अग्निशमन प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी आवश्यक ती माहिती हवी असेल तर संबंधीताने www.mahafireservice.org या संकेतस्थळावर पाहावे.

६) सदर इमारतीच्या ठिकाणी अग्निशमन वाहनास व दलास पोहचण्यासाठी आवश्यक ती जागा व रस्ता असणे बंधनकारक राहील.

७) सर्व आवश्यक ते अग्निशमन प्रतिबंधात्मक साहित्य जसे की, सीओटी/डीसीपी, फोम , फायर बकेट आय एस : 2190/15683 मार्क च्या दर्जाचे असणे बंधनकारक राहील.

८) इमारतीमध्ये लावण्यात आलेले अग्निशमन प्रतिबंधात्मक साहित्य जसे की, सीओटी/डीसीपी, फोम व इतर Extinguisher ची वैद्यता संपल्यानंतर पुन्हा Extinguisher भरून (Refill) घेणे बंधनकारक राहील.

९) सर्व अग्निशमन प्रतिबंधात्मक साहित्य हे सुस्थितीत तसेच तात्काळ उपलब्ध होईल अशा ठिकाणी ठेवणे बंधनकारक राहील.

१०) आपत्कालीन दूरध्वनी क्रमांक जसे पोलीस 100, फायर-101, अम्बुयूलन्स 102 संबंधित इमारतीच्या दर्शनी भागामध्ये लावणे बंधनकारक राहील.

११) सदर इमारती मध्ये उष्णता वर्धक काम करावयाचे असल्यास संबंधित अधिकाऱ्याची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

१२) अंतर्गत जिन्याजवळ कुठल्याही प्रकारची गॅस पाईप लाईन असू नये.

१३) जिन्या जवळ कुठल्याही प्रकारची राहण्याची जागा, भांडार किंवा तत्सम जागा इतर वापरात असू नये तसेच ज्वालाग्राही पदार्थ असू नयेत.

१४) बाहेर पडण्यासाठी दिशा दर्शकबाण हे जमिनीपासून 1.5 मीटर इतक्या उंचीवर असावेत तसेच चमकदार (Florescent paint) असावेत व ते कुठल्याही परिस्थितीत खराब होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.

१५) सर्व विद्युत साहित्य अग्नी अवरोधक व तत्सम आय एस दर्जाचे असावेत व साठा दर्शवणाऱ्या लाल रेषावर असावेत.

१६) Exit Fire Escape दर्शविणारे चिन्ह हे चमकदार अक्षरात अंधारात देखील दिसतील असे असावे.fire Excape नेहमी चालू स्थितीत राहील यांची काळजी घ्यावी लागेल.

**१७) मा. संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी नोंदणीकृत केलेल्या अनुज्ञप्तीधारक अभिकरणामार्फत फायर ऑडीट दर सहा माहिन्यांनी जानेवारी व जुलै इमारतीमध्ये बसविण्यात आलेल्या अग्निशमन यंत्रणा ची तपासणी करून सुव्यवस्थित कार्यरत असल्याचा फॉर्म ब नगरपरिषदेस सादर करण्याची जबाबदारी अर्जदाराची/ जागेच्या मालकाची राहील. त्यानंतरच अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्राची वैध्यता वाढवून देण्यात येईल.**

१८) सदर इमारतीमध्ये फायर पंप इंस्टोलेशन, इमरजन्सी लाईटिंग सिस्टीम (स्वयंचलित जनरेटर) सिस्टीम बॅकअप (डी.जि.सेट) असणे बंधनकारक आहे. आपत्कालीन स्थितीत सदर यंत्रणा कार्यान्वित होईल यांची जबाबदारी अर्जदाराची/ जागेच्या मालकाची राहील.

<u>विद्युत सेवा</u>

अ) विद्युत पुरवठा करणारे वायर स्वतंत्र नळीमधून गेलेले असले पाहिजे सर्व नळया ह्या एका नंतर एकच्या मजल्यावर अग्नि अवरोधक बनवलेल्या असाव्यात.

आ) विद्युत पुरवठा करणाऱ्या नळयामधून पाण्याचे पाईप, टेलीफोनचे वायर, इतर फोनचे वायर , गॅस पाईप किंवा इतर कुठलाही वायर असू नये.

इ) पाण्याचे पंप, चढण्या उतरण्याचा जिना, मोकळया जागे मधील विद्युत पुरवठा यासाठी स्वतंत्र लाईन टाकलेली असावी जेणेकरून अग्निशमन सर्किटवर परिणाम होणार नाही.

ई) धोका, धुम्रपान, निषेधबोर्ड, ट्रान्सफार्मर स्विच यार्डच्या गेटवर बसविलेले असावे.

१९) सुलभ हाताळण्यासारखे अग्निशमन साहित्य तपासणीच्या वेळी दर्शविण्यात आलेल्या ठिकाणी ठेवलेले असले पाहिजे जसे की, सी.ओ.टू./डी.सि.पी. फोम, फायर बकेट हे साहित्य हे तत्सम आय.एस. दर्जाचे असावे. सर्व अग्निशमन साहित्य हे सुस्थितीत असणे बंधनकारक राहील व आपात्कालीन परिस्थतीत तात्काळ उपलब्ध असणे बंधनकारक राहील.

२०) नियमानुसार आपल्या इमारतीचे इलेक्ट्रीकल ऑडीट दर ६ माहिन्यांनी करणे बंधनकारक राहील.

२१) अग्निसुरक्षा परीक्षण अहवाला (Fire Audit report) नुसार अग्निशमनबाबत सर्वच उपाययोजना जिंदाल विद्या मंदिर, कळमेश्वर याठिकाणी करणे आपणास बंधनकारक राहील.

२२) सदर अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र आपले स्कूल बिल्डींग चे जेवढे क्षेत्रफळ आहे तेवढे क्षेत्रफळाला देण्यात येत आहे.

२३) कार्यालय न.प. कळमेश्वर ब्राम्हणीद्वारे वेळोवेळी अग्निशमन बाबत करण्यात आलेल्या उपाययोजना बाबत स्थळ पाहणी करण्यात आली असता जुने लावण्यात आलेले अग्निशमन साहित्य व इतर उपाययोजना ज्या स्थितीत होत्या त्याच स्थितीत असणे बंधनकारक राहील.

२४) विद्या मंदिराची जागा व आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवावा लागेल. इतरत्र कचरा टाकणे, रोडवर वाहन ठेवण्यास तसेच प्लास्टिक पिशवी चा वापर करण्यास सक्त मनाई आहे. असे दिसून आल्यास प्रशासकीय दंडासह आपणाकडून वसूल केला जाईल.

२५) सदर इमारतीमध्ये अग्निशमन बाबत सर्वच उपाययोजना करण्याची जाबाबदारी आपणावर असल्याने इमारतीमध्ये धोका उद्भवल्यास पर्यायी उपाययोजना ही करावी लागेल व सर्वस्वी जबाबदारी आपली असेल त्यात न.प. ची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

२६) जागेबाबत कोणताही वाद अथवा नागरिकांचे तक्रार प्राप्त झाल्यास हे नाहरकत प्रमाणपत्र रद्द समजले जाईल. आपणास देण्यात आलेले अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याचा अधिकार मा. मुख्याधिकारी न.प. कळमेश्वर-ब्राम्हणी यांना राहील.

२७) शासन निर्णयाचे व विस्फोटक नियम २००८ चे नियम ८३ ते ८८ नुसार नियमाचे तंतोतंत पालन करावे लागेल.

२८) वेळोवेळी शासनाचे नियमाचे तंतोतंत पालन करणे अनिवार्य राहील. अग्निशमन ना-हरकत प्राप्त दिनांकापासून शासनाच्या आलेले सर्व कायदे, नियम, शासन निर्णय लागू राहतील. व्यवसायात आपणास फेरबदल करता येणार नाही.

२९) नैसर्गिक आपत्ती किंवा इतर कोणत्याही कारणाने मालमत्तेचे, प्राणहानी, वित्तहानी झाल्यास किंवा इतर कोणतेही नुकसान झाल्यास संपूर्ण जबावदारी आपली राहील. याकरीता न.प. किंवा शासन जबावदार राहणार नाही.

३०) अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र दिनांक ३०/०६/२०२३ पर्यंतच अधिकृत राहील. यानंतर आपणास सुचविल्याप्रमाणे अग्निशमन बाबत त्रुटी असल्यास उपाययोजना कराव्या लागतील त्यानंतरच आपणास अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्राची वैध्यता या कार्यालयाकडून वाढवून देण्यात येईल.

**३१) <u>प्राप्त अर्ज, अग्निसुरक्षा परीक्षक प्रमाणपत्र (fire Audit Report) ,विद्युत विभागाचे प्राप्त प्रमाणपत्र व नस्तीमध्ये असणारे सर्वच दस्तावेजाच्या च्या अधीन राहून आपणास अग्निशमन बाबत सर्वच उपायोजना सदर जागी करावे लागेल. या अटीवर अग्निशमन ना- हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.</u>**

३२) संवैधानिक तरतुदीमध्ये वारंवार होणाऱ्या बदलास अधीन राहून या मध्ये अतिरिक्त सूचना देण्याचा अधिकार सदर स्वाक्षरीकर्त्यांने राखून ठेवण्यात आला आहे.

३३) सदर अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र कुठल्याही परिस्थितीत रद्द करण्याचा अधिकार मा. मुख्याधिकारी न.प. कळमेश्वर ब्राम्हणी यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.त्याबाबतची कुठलीही दाद न्यायालयात मागता येणार नाही.

३४) हे [illegible] ना-हरकत प्रमाणपत्र असून जे की, **वितरीत केलेल्या तारखे पासून दिनांक ३०/०६/२०२३ या कालावधीकरिता वैद्य राहील.** त्यानंतर अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याची जबाबदारी आपणास बंधनकारक राहील.

३५) वरीलप्रमाणे संपूर्ण १ ते ३५ संपूर्ण अटी व शर्ती चे तंतोतंत पालन करावे लागेल. उल्लंघन केल्यास अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र रद्द समजले जाईल. याच **अटी शर्ती वर आपणास** **दिनांक ३०/०६/२०२३ कालावधीकरिता अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.**

मुख्याधिकारी
नगर परिषद, कळमेश्वर-ब्राम्हणी